# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये व परिसंस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय- बी.बी.ए./बी.सी. ए. या अभ्यासक्रमांना प्राप्त शासन मान्यतांच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याबाबत**

**संदर्भ- १) शासन निर्णय क्र. मान्यता-२०२४/प्र.क्र.२४५/तांशि-४ दि. ०७/०८/२०२४**
**२) या कार्यालयाचे संदर्भ क्र. शिवाजी वि/संलग्नता/टी-२/एसआरएस/२०२४-२५/१२८१ दि.१२/०८/२०२४ रोजीचे परिपत्रक**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून ज्या महाविद्यालयांना ए.आय.सी.टी.ई च्या मान्यतेनुसार बी.बी.ए./बी.सी.ए., एम.सी.ए. या अभ्याक्रमांकरिता शासन मान्यता प्राप्त झाली आहे अशा महाविद्यालयांना दि. १३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार दि. १३/०८/२०२४ अखेर प्रस्ताव हस्तपोहोच करण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि, याअनुषंगाने खालीप्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालयात जुन्या शासन मान्यतेस अनुसरून सुरू असलेले बीबीए/बीसीए अभ्यासक्रम यांची उपरोक्त शासन निर्णयात नमुद प्रवेश क्षमता समान असल्यास सदरची मान्यता ग्राह्य धरण्यात येत असून याबाबत विद्यापीठाची संलग्नीकरण प्रक्रिया राबविण्यात येत असून अशा महाविद्यालयांनी पुन:श्च प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता नाही.

२. ज्या महाविद्यालयामध्ये यापुर्वी बीबीए/बीसीए हे अभ्यासक्रम सुरू नव्हते व ज्यांनी विद्यापीठाकडे सदरचे अभ्यासक्रम सुरू करण्याकरिता दि. १३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रस्ताव सादर केला नव्हता तथापि. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेस अनुसरून उपरोक्त शासन निर्णयानुसार मान्यता प्राप्त झाली आहे. अशा महाविद्यालयांनी तंत्र शिक्षण परिषदेची प्रवेश प्रक्रिया लक्षात घेता विहीत शुल्कासह प्रस्ताव तात्काळ हस्तपोहोच सादर करावा

२. तथापि, शासन मान्यतेने सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या सध्याच्या प्रवेश क्षमतेपेक्षा उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमुद प्रवेश क्षमता जास्त असल्यास सदर अधिकच्या प्रवेश क्षमतेसाठी तंत्र शिक्षण परिषदेची प्रवेश प्रक्रिया लक्षात घेता विहीत शुल्कासह प्रस्ताव तात्काळ हस्तपोहोच सादर करावा तदनंतरच संलग्नीकरणाची प्रक्रिया राबविण्यात येईल. प्रस्ताव सादर न करणाऱ्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही. याची कृपया नोंद घेण्यात यावी.

कळावे,

आदेशान्वये,
PSPande
(डॉ. पी. एस. पांडव)
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

संदर्भ क्र. - संलग्नता/टी-२/ 1790
दिनांक - 13 AUG 2024
F:\23.04.2021\sm\sm\Circular\Circular 2019.1.docx